दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक ११८ वा मंगळवार दि.२६ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | INDOASIAN
Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

# किरकोळ महागाई उच्च पातळीवर




मुंबई/नवी दिल्ली : देशात महागाई प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढत आहे. किरकोळ महागाई दर अजूनही उच्च पातळीवर असून भारतीय रिजर्व्ह बँक(आरबीआय)ची डोकेदुखी वाढली असल्याचे दिसून आले आहे.

अमेरिकेची केंद्रीय बँक फेडरल रिझर्व्हने आणखी काही काळ व्याजदर स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. अशा स्थितीत पुढील महिन्याच्या सुरुवा-तीला रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक बैठकीत पुन्हा एकदा व्याजदर स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. एमपीसीची बैठक यावेळी ४ ते ६ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे. यामध्ये, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया रेपो दर वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा निर्णय घेते, ज्याचा थेट परिणाम गृहकर्जापासून ते वैयक्तिक कर्जापर्यंतच्या लोकांच्या ईएमआयवर होतो.

किरकोळ महागाई कमी करण्यासाठी आरबीआयने गेल्या वर्षी रेपो दरात २.५० टक्क्यांनी वाढ केली होती. परंतु देशातील महागाईचा दर अजूनही जास्त आहे. या वर अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेल्या फेडरल रिझर्व्हच्या धोरणाचा परिणाम जगभरातील अर्थव्यवस्थांवर होत आहे.

व्याजदरात बदल नाही?

बँक ऑफ बडोदाचे मुख्य अर्थतज्ज्ञ मदन सबनवीस म्हणतात की, यावेळीही आरबीआय व्याजदरात कोणताही बदल करणार नाही. महागाईचा दर अजूनही जास्त आहे. महागाईबाबत आरबीआयचा अंदाज योग्य मानला तर ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीतही तो ५% पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. त्यामुळे जानेवारी-मार्च तिमाहीतही रेपो दरात कोणताही बदल होणार नाही.

म्युच्युअल फंड पोर्टफोलिओ

मदन सबनवीस म्हणाले की, खरीप पिकांचे आणि विशेषत: कडधान्यांचे उत्पादन आणि भाव याबाबत अनिश्चितता आहे. याचा परिणाम महागाईवरही होणार आहे. किरकोळ महागाईच्या अलीकडील आकडेवारीवर नजर टाकली तर ऑगस्टमध्ये ती ६.८३ टक्के होती. तर जुलैमध्ये ती ७.४४ टक्के होती.

रेपो रेट जैसे थे राहणार?

आसीआरए लिमिटेडच्या मुख्य अर्थतज्ज्ञ आदिती नायर म्हणतात की, टोमॅटोच्या किंमती घसरल्यामुळे सप्टेंबरमध्ये महागाई दर ५.३ ते ५.५ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. तरीही, ऑक्टोबरच्या एमपीसीची बैठकीत रेपो दरात कोणताही बदल होणार नाही. रिझर्व्ह बँकेने २०२३-२४ मध्ये किरकोळ महागाई दर ५.४ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

## भारत-कॅनडा वादात अमेरिकेची मध्यस्थी?

नवी दिल्ली : भारत आणि कॅनडामध्ये मोठा वाद निर्माण झाला आहे. दोन्ही देश आक्रमक पवित्रा घेत आहेत. खलिस्तानवादी हरदिपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात असल्याची माहिती अमेरिकेने कॅनडाला दिली होती. त्यानंतर कॅनडाच्या पंतप्रधानांनी भारतावर गंभीर आरोप केले. माहितीनुसार, भारत आणि कॅनडामध्ये निर्माण झालेल्या वादावर तोडगा काढण्यासाठी आता अमेरिकाच मध्यस्थी करणार आहे.

खलिस्तानवादी हरदिपसिंग निज्जर याची हत्या भारतीय गुप्तचर यंत्रणेने केल्याचा दावा कॅनडाने केलाय. भारताने हा दावा तथ्यहीन असल्याचे म्हणत फेटाळून लावला आहे. असे असले तरी कॅनडा आपल्या आरोपावर ठाम आहे. निज्जर याच्या हत्येमागे भारतच असल्याची गुप्त माहिती अमेरिकेनेच पुरवल्याचे न्यूयॉर्क टाईम्सने म्हटले आहे. तसेच भारताने याप्रकरणातील तपासात सहकार्य करावे असे आवाहन अमेरिकेकडून करण्यात आले आहे. दरम्यान, कॅनडा खलिस्तानवादी चळवळीला पाठिंबा देत असल्याचा आरोप भारताने केला आहे. कॅनडा खलिस्तानी दहशतवाद्यांचे आश्रयस्थान ठरत असल्याची टीका परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंधम बागची यांनी केली होती. केंद्र सरकारने परदेशात राहणा-या खलिस्तान समर्थक लोकांच्या भारतातील संपत्ती जप्त करण्याच्या सूचना एनआयएला दिल्या आहेत.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती उत्साहात संपन्न

लातूर दि.२५ :- महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारमंचावर उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, जयंती उत्सव समितीचे समन्वयक प्रा. धोंडीबा भुरे आणि भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांची उपस्थिती होती.



सर्वप्रथम पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. धोंडीबा भुरे म्हणाले की, महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे आपण विविध महापुरुषांच्या जयंती महाविद्यालयाच्या प्राध्यापक कक्षामध्ये नियोजित विभागामार्फत पार पाडतो यामध्ये प्रत्येकाला विभागाला जबाबदारी दिल्यामुळे प्रत्येकाचा सहभाग कार्यक्रमांमध्ये असतो यामुले महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या विचाराची माहिती होते. यावेळी डॉ. रत्नाकर बेडगे यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या राष्ट्रीय कार्याचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यांचा जीवन परिचय सर्वांना करून दिला. तसेच कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे कार्य विद्यार्थ्यांना माहिती व्हावे या उद्देशाने भूगोल विभागाने अत्यंत नियोजित पद्धतीने ही जयंती सर्वांच्या उपस्थितीमध्ये साजरी केली त्याबद्दल त्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अभय धाराशीवे यांनी केले तर आभार डॉ. शिवप्रसाद धरणे यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. सदाशिव दंदे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. शिवकुमार इजारे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, विनायक लोमटे, रत्नेश्वर स्वामी, प्रा. शंकर भोसले, प्रा. मारोती माळी यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जलील सैय्यद, केशव घंटे, संदीप मोरे, अशोक शिंदे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला जयंती उत्सव समितीचे सर्व सदस्य, महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि भूगोल विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# १० नोव्हेंबरला देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते किल्लारी कारखान्यांची मोळी पडणार

**सर्वसाधारण सभेत सर्वानुमते ठराव मंजूर ....**

कारखान्याची गाळप क्षमता २५०० टिसीडी पर्यंत वाढविणे, इथेनॉल प्रकल्प उभारणे, कारखाना मालकीचा पेट्रोल पंप भाडेतत्त्वावर देणे, सी टाईप शॉपींग कॉम्लेक्स उभारणे, प्रेसमडपासून खत निर्मिती प्रकल्प उभारणे, कारखाना जमिनीचे मोजणी करणे, सौरउर्जा प्रकल्प उभारणे, केंद्रीयमंत्री अमित शाहा,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कर्ज मंजूर करून दिल्याबद्दल अभिनंदनाचा ठरावासह एकूण सोळा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले...



औसा - येणाऱ्या १० नोव्हेंबरला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते किल्लारी सहकारी साखर कारखान्याची मोळीचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती आमदार अभिमन्यू पवार यांनी (दि.२४) सप्टेंबर रोजी आयोजित किल्लारी सहकारी साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत दिली.यावेळी कारखान्याच्या यंदाच्या गळीत हंगामाच्या दुष्टीने जलदगतीने काम सुरु असल्याचे त्यांनी सांगितले या सर्वसाधारण सभेत कारखान्याच्या दुष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. यावेळी मंचावर गुंडप्पा बिराजदार,उस्मानाबाद जिल्हा बँकेचे संचालक निवृत्ती भोसले, सभापती शेखर सोनवणे, उपसभापती प्रा भीमाशंकर राचट्टे, भाजपचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, माजी नगराध्यक्ष किरण उटगे, प्रकाश पाटील, सुभाष पवार, सुनील उटगे, ज्ञानेश्वर वाकडे, काकासाहेब मोरे,विजयकुमार सोनवणे, गोविंद भोसले, युवराज बिराजदार, प्रवीण कोपरकर, रवींद्र हेळंबे, सदाशिव जोगदंड, सुधीर पोतदार, सचिन आनसरवाडे, कारखाना व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रवीण फडणवीस, एस. आर.नाईकवाडी, कार्यकारी संचालक आर. एस. बोरावके आदी शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आ. अभिमन्यू पवार बोलत होते की बंद राहिलेले किल्लारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या दृष्टीने सहकारी तत्त्वावर सुरू व्हावा यासाठी आपण सर्वस्वी ताकद पणाला लावली. मी जेवढे रक्त हा कारखाना सुरू करण्यासाठी अटवले आहे. त्यामध्ये नवीन कारखाना उभा राहिला असता पण हा कारखाना मला सहकारी तत्त्वावर सुरू करायचा होता. या कारखान्याला राज्यात कोणीही कर्ज देण्यास तयार नव्हते कारखान्याची मालमत्ता गहाण ठेवली आहे. आशावेळी वैयक्तिक हमीवर हातऊसने पैसे उपलब्ध केले आणि कारखाना सुरू केला.यानंतर सरकारकडेही वैयक्तीक हमी दिल्यानंतर ५० कोटींचे कर्ज मंजूर झाले असून त्यामुळे या कारखान्याशी असलेली शेतकऱ्यांची नाळ लक्षात घेता हा कारखाना टिकला पाहिजे तो चालला पाहिजे म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या किल्लारीला ऊस द्यावा असे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी करून तालुक्यातील इतर कारखान्या तुलनेत अधिकचा भाव देऊ अशी ग्वाही किल्लारी कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत शनिवारी दिली. किल्लारी साखर कारखान्याचा कारभार पुर्णपणे पारदर्शक असून राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्वांनी किल्लारी कारखाना सुरळीतपणे चालू राहण्यासाठी सहकार्य करावे येथे मीही राजकारण करणार नाही तुम्ही करू नये अशी भावनिक साद आ. अभिमन्यू पवार यांनी दिली.

# जलक्रांतीतूनच सापडेल समृद्धीचा महामार्ग - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर

**तर मंत्रालयावर मोर्चा काढू- आ.कराड**

दुचाकी रॅलीत सहभागी झालेले आ.रमेशअप्पा कराड म्हणाले की, आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुरू केलेल्या जलसाक्षरता अभियानाचे फळ आपल्याला निश्चितपणे मिळणार आहे. शासनाकडून दिले जाणारे पाणी मांजरा व तेरणा खोऱ्यात घेतल्याशिवाय संभाजीराव पाटील स्वस्थ बसणार नाहीत.तरीही या आंदोलनाची सरकारने दखल घेतली नाही किंवा मागण्या मान्य होत नाहीत असे लक्षात आले तर आ. निलंगेकर यांच्या नेतृत्वात मंत्रालयावर मोर्चा काढू. लातूर ग्रामीण मतदारसंघातील प्रत्येक नागरिक या मोर्चात सहभागी होईल,अशी ग्वाही आ.कराड यांनी दिली.

**अभियानाचा आज समारोप ...**

श्री गणेशाच्या स्थापनेपासून आ.पाटील यांच्या नेतृत्वात सुरु असणाऱ्या जलसाक्षरता अभियानाचा मंगळवारी (दि.२६) लातूर येथे समारोप होणार आहे.सोमवारपर्यंत या रॅलीने १ हजार किलोमीटरपेक्षा अधिक प्रवास पूर्ण केला.ग्रामीण भागातील दुचाकी रॅली पूर्ण झाल्यानंतर मंगळवारी दिवसभर ही रॅली लातूर शहरात फिरणार आहे.शहराच्या विविध भागातील नागरिकांशी संवाद साधल्यानंतर सायंकाळी हनुमान चौक येथे अभियानाचा समारोप होणार आहे.



लातूर/प्रतिनिधी: विकासासाठी पाणी अत्यावश्यक आहे.पाणी नसल्यामुळेच मराठवाडा व लातूर जिल्ह्याचाही विकास खुंटलेला आहे. विकासाच्या महामार्गावर वाटचाल करण्यासाठी जलक्रांती आवश्यक आहे. म्हणूनच मराठवाड्याच्या हक्काचे पाणी पदरात पाडून घेण्यासाठी आपण जलसाक्षरता अभियान सुरू केले असल्याचे प्रतिपादन माजीमंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले. सोमवारी (दि.२५) लातूर ग्रामीण मतदार संघातील गंगापूर, निवळी,मुरुड,काळे बोरगाव,काटगाव, भोईसमुद्रगा या गावात आ.निलंगेकर यांच्या नेतृत्वातील जलसाक्षरता अभियानाची दुचाकी रॅली पोहोचली. त्या ठिकाणी उपस्थितांशी संवाद साधताना आ. निलंगेकर बोलत होते.आ. रमेशअप्पा कराड यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी,गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी व नागरिकांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आ.निलंगेकर म्हणाले की,ज्या भागात पाणी असते त्या भागाचा गतीने विकास होतो.पाणी असेल तरच मानवी वस्ती होते. त्या अनुषंगाने उद्योग - व्यवसाय विस्तारत जातात.यातून भौतिक सुविधांची निर्मिती होते. पाणी उपलब्ध असणाऱ्या ठिकाणीच मोठे उद्योगधंदे उभारले जातात.त्यातून रोजगार निर्मितीही होते. परिसराच्या विकासाला चालना मिळते. मराठवाड्यात पाणी नसल्यामुळे आजपर्यंत ते शक्य झाले नाही.पाणी नसल्यामुळे उद्योजक या परिसरात येण्यास तयार होत नाहीत.परिणामी येथे रोजगारही मिळत नाही. त्यामुळेच मराठवाड्यातील तरुणांना रोजगाराच्या शोधात इतरत्र स्थलांतरित व्हावे लागते.ते थांबविण्यासाठी हक्काचे पाणी आपल्याला मिळालेच पाहिजे.राज्य शासनाने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला असून ते पाणी मांजरा व तेरणा खोऱ्यात आले तर फायदा होणार आहे.या माध्यमातून आपणास विकासाचा महामार्ग सापडणार असून राज्याच्या इतर भागांच्या तुलनेत मागास असणारा हा परिसर सुजलाम्, सुफलाम् होण्यास मदत होणार असल्याचेही आ.निलंगेकर यांनी सांगितले.

आपल्या भागाच्या विकासासाठी हे अभियान सुरू केले असून प्रत्येक नागरिकाने त्यास पाठिंबा देत हक्क मिळवण्यासाठीच्या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

ठिकठिकाणी दुचाकी रॅली पोहोचल्यानंतर नागरिकांनी आ.निलंगेकर यांचे उस्फुर्त स्वागत केले. अनेक ठिकाणी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. ग्रामस्थांनी पाण्यासंदर्भातील आपल्या व्यथा आ.निलंगेकर यांना सांगितल्या.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# भारतीय संसदेकडून ‘शक्ती’चा सन्मान

ज्या शिव शक्तीवर हे संपूर्ण ब्रह्मांड व्यापलेले आहे, ती शक्ती म्हणजे आदिमाता, शिव जर सृष्टीच्या निर्मितीचे कारण असेल, तर शक्तीमुळे हे विश्व निर्माण झाले. हिंदू धर्मात अशी मान्यता आहे की, निर्माण आणि सर्व प्रकारच्या बदलांचे कारण ही शक्तीच आहे. शक्ती हे विश्वाचे अस्तित्व आणि मुक्ती आहे.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते
रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते
सर्वास्तत्राफलाः क्रियाः ।।

हा श्लोक भारतीय संस्कृतीत पूर्वपार म्हटला जात आहे. या श्लोकानुसार जेथे स्त्रियांची पूजा केली जाते, त्यांना मान दिला जातो, तेथे देवता आनंदाने राहतात. जेथे त्यांचा मान राखला जात नाही, तेथील सर्व कार्ये निष्फळ होतात. स्त्रियांची पूजा, त्यांचा सन्मान आणि त्यांचं अस्तित्व यावरच हे विश्व आहे. पण ज्या आदिशक्तीचे, पार्वती, लक्ष्मी, सरस्वती यांचे पूजन या भारतात पूर्वापार होते आहे, त्याच भारतात स्त्रियांचे अनन्वित छळ सुद्धा केले जात आहेत. भारत आधुनिक झाला तरी स्त्रियांना त्रास देण्याची पद्धत आणि परंपरा मात्र अद्यापही सुरू आहे. ज्या देशाने लक्ष्मी, सरस्वतीचे पूजन केले, दुर्गेसमोर शरण गेले त्याच देशाने सावित्रीबाई फुलेंपासून दिल्ली, कोपर्डीतल्या निर्भयापर्यंतचा अत्यंत घृणास्पद, लांच्छनास्पद प्रवास पाहिला आहे. याच देशात एकेकाळी सतीची परंपरा होती, तर देवदासी याच देशात होत्या. गरिबीने अनेकांना आपल्या कोवळ्या वयात घराचे उंबराठे ओलांडायला लावले. कधी हुंड्यासाठी हक्काच्या नवऱ्याकडून छळ झाला, तर कुठे अब्रूचे धिंधवडे निघाले. स्त्री शिकली, पुढारली पण शिक्षित घराला सुशिक्षितपणाचं लेबल लावून घरात स्त्रीचा शारीरिक आणि मानसिकता छळ सुरूच राहिला. अंतराळापर्यंत झेप घेणाऱ्या स्त्रीच्या स्वतःच्या घरातल्या अवकाशात श्वास घेण्यासाठी सुद्धा होणारा कोंडमारा याचं देशाने पाहिला आहे.

हा प्रवास आणि ही कहाणी अद्याप संपली नाहीय. ती सुरूच आहे. अनेक घराचे कोनाडे मुसमुसत आहेत. अनेक घरांच्या बंद खोल्यांमध्ये कित्येक हुंदके दबले आहेत. घुसमट सुरूच आहे. कारण या हुंदक्यांचे रूपांतर स्वच्छ, स्पष्ट आवाजात करणारी ताकद अद्यापही म्हणावी तशी पाठीशी नव्हती. अनेकजणी शिकल्या, पण खूप मोजक्या जणींनी समाज, संघटन याच्याविरुद्ध आवाज उठवला आणि स्वतःच अस्तित्व निर्माण केलं. हे करताना त्या स्त्रियांनी केलेला संघर्ष, दिलेला लढा हा स्त्रीत्वाच्या ताकदीची झलक देणारी गोष्ट आहे. आज या प्रवाहाविरुद्ध उठून उभ्या राहणाऱ्या महिला समाजासामोर, अन्य स्त्रियांसमोर आदर्श ठरल्या आहेत आणि त्यांच्याच या संघर्षाची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर संसदेच्या नव्या भवनात प्रवेश करतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेले महिला आरक्षण बिल हे भारताच्या उज्वल भविष्याचे स्पष्ट संकेत देणारे बिल ठरले आहे.

महिलांसाठी लोकसभा, विधानसभेत आरक्षण हवे ही मागणी सर्वपक्षीय महिलांची होती. त्याला मूर्त रूप आणून खऱ्या अर्थाने समाजातील प्रत्येक घटकातील महिलांना प्रतिनिधित्व देण्यासाठी हे बिल एक माइलस्टोन बनणार आहे. लोकसभा आणि विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यासाठी हे विधेयक लोकसभेत मांडण्यात आलं होतं. लोकसभेत हे विधेयक मंजूर झालं आहे. त्यामुळे आता लोकसभा आणि देशातील प्रत्येक राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव राहणार आहे. म्हणजेच १०० पैकी ३३ जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत. त्यामुळे संसद आणि विधानसभांमधील महिलांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे देशाच्या विकासाच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यात महिलांचंही योगदान मोठं राहणार आहे. ही अत्यंत आशादायी गोष्ट आहे. राजकारण म्हटले की, त्यात आरोप–प्रत्यारोप हे आपसूक येतातच. पण असे असले तरीही भारताच्या आजवरच्या एकमेव असलेल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वातील कणखरता कोणीच नाकारू शकलेले नाही. भारतीय स्त्रीत्वाचे इंदिरा गांधी या मूर्तिमंत उदाहरण होत्या. आता असेच नेतृत्व करण्याची संधी भारतातील अनेकजणींना मिळणार आहे आणि संधीच सोने करण्याची ताकद फक्त स्त्रियांमध्येच आहे. जिथे जातील तिथे सोनं पिकवतील, असं स्त्रियांबद्दल म्हटलं जातच. अशा स्त्रिया जर भारतीय विकास प्रक्रियेत येणार असतील, तर या देशाचं भविष्य उज्ज्वल आहे, हे निश्चित.

# शासन घरी धार्मिक उत्सव नको

भारतात अनेक धर्माचे लोक एकत्र भारतीय म्हणून राहतात. प्रत्येक धर्माला स्वतंत्र असे अस्तित्व असुन प्रत्येक धर्म आपल्याला रुढी, परंपरा, संस्कृतीचे जतन करून धर्माची उपासना करण्याचा अधिकार हा भारतीय संविधानाने दिलेला आहे. कायद्या समोर कोणताही धर्म लहान वा कोणताही धर्म मोठा नाही. थोडक्यात भारत हा धर्म निरपेक्ष देश आहे. धर्म हि खाजगी बाब आहे व धर्माचे पालन आपण आपल्या वैयक्तिक जिवनात करू शकतो. सार्वजनिक ठिकाणी किंवा शासकीय पातळीवर कोणत्याही धर्माला महत्त्व न देता माणसाला महत्त्व देऊन त्याची भारतीय म्हणून ओळख आहे. परंतु स्वतः ला सुशिक्षित समजणारे आणि शासकीय व निमशासकीय अशा ठिकाणी काम करणारे लोक धार्मिकता आणून वातावरण दुषीत करण्याचा प्रयत्न करतात. आणि हल्ली ते प्रमाण वाढले आहे. सत्य व अंधविश्वास, पांखड, थोतांड व वैज्ञानिक बोलले तर येथे लोकांना मिर्ची लागते. परंतु अज्ञानात राहुन अंधविश्वास, पाखंड, असत्य यावर विश्वास ठेऊन बोलले तर त्या व्यक्तीला चांगले माणले जाते. कोणी कोणत्या धर्माचे पालन करावे हा सर्वस्वी वैयक्तिक प्रश्न असताना त्या धार्मिक बाबीला सार्वजनिक किंवा शासकीय निमशासकीय पातळीवर आणणे हे चुकिचे आहे. प्रत्येक धर्मानुसार एखाद्या तरी सन उत्सव किंवा विधी हा उच्च असतो. आणि तो सन उत्सव त्या धर्मातील लोक मोठ्या उत्साहाने साजरे करतात. परंतु जे सन उत्सव घरात साजरे करायचे ते शासकीय निमशासकीय ठिकाणी सुरू केले प्रश्न निर्माण होणार. कारण शासकीय निमशासकीय कार्यालय व संस्था येथे संविधान लागु असते. संविधानाने दिलेली ओळख भारतीय म्हणून आहे. धर्माच्या आधारे कोणत्याही व्यक्तीला ओळख दिली नाही. म्हणुन नोकरी करणारे अर्थात बुद्धिमान लोक असतात या लोकांना किमान धार्मिक सन उत्सव शासकीय कार्यालय संस्थेत साजरा करू नये हे ही कळत नसेल तर त्या बुद्धीचा फायदा नेमका आहे तरी काय? प्रत्येक धर्माची विचारधारा वेगळी आहे. काही विचारावर धार्मिक मतभेद आहेत याचाच अर्थ धार्मिक सन उत्सव शासकीय व निमशासकीय कार्यालय व संस्थेमध्ये साजरे झाले तर लोक प्रश्न विचारणारच कारण शासकीय व निमशासकीय संपत्ती ही तेथे काम करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांची नसुन जनतेची आहे धर्माची ही नाही. म्हणून धार्मिक विधी शासकीय कार्यालय व संस्थेत साजरा करणे म्हणजे आपल्या धर्मातील चालिरीती जबरदस्ती इतरांवर थोपवने होय. असे कृत्य केल्यानेच धार्मिक टिका टिप्पणी होत असते. एकिकडे गणपती, दहिहंडी, सत्यनारायण, लक्ष्मी पुजन केले जाते. हे फक्त हिंदु धर्मातील काहीच लोक माणतात परंतु जे मानत नाहीत किंवा मुस्लिम ख्रिश्चन, जैन, बौद्ध या धर्मातील लोक वरिल गोष्टींना मान्यता देत नाहीत मग इतर धर्माचे विचार तुडवून आपलाच धर्म लादणे हे चुकीचे आहे. शिकलेल्या व नोकरी करणाऱ्या लोकांना आपण शासकीय ठिकाणी धार्मिक पुजा अर्चा किंवा सन उत्सव साजरे करू नये याने वाद निर्माण होऊ शकतात हेही शासकीय कर्मचारी अधिकारी यांना समजत नसेल तर आपण किती धर्मांध आहोत हे लक्षात येते. शासकीय कार्यालयामध्ये धर्मांधता वाढून कोणत्याही धार्मिक पद्धतीने सन उत्सव किंवा विधीने कोणतेही काम होऊ नये हे तर नैतिकतेचा विषय आहे. परंतु नैतिकता विसरून लोक धार्मिक विधी, सन उत्सव शासकीय कार्यलय किंवा संस्थेत करत होते म्हणून सरकारला पत्रच काढावे लागले. सर्व सामान्य लोकांचे काम करताना शासकीय अधिकारी नियम दाखवतात परंतु धार्मिक सन उत्सव शासकीय निमशासकीय संस्थेत साजरा करताना नियम धाब्यावर बसतात यालाच प्रामाणिक पणा म्हणायचे हा प्रश्न आहे. देवी देवतांचे फोटो शासकीय कार्यालयात लाऊ नये व धार्मिक सन उत्सव साजरे करू नये अशा आशयाचे पत्र सरकारने ने २००२ ला काढल्याचा उल्लेख अनेक ठिकाणी आहे. त्या पत्राची अंमलबजावणी होत नाही व शासकीय कार्यालयात धार्मीकता वाढून धर्मनिरपेक्षेला तडा जात आहे असे पुन्हा दिसले तेव्हा पुन्हा ४ जानेवारी २०१७ रोजी ग्राम व जलसंधारण विभागाने पत्र काढून देवदेवतांचे फोटो व धार्मिक पद्धतीने पुजा अर्चा, सत्यनारायण सारखी क्रीया करण्यावर बंदी घातली. शासकीय पत्राचा आधार घेऊनच नाशिकचे तत्कालीन आयुष्य व कायद्याचे पालन करणारे अधिकारी म्हणजे तुकाराम मुंढे यांनी नाशिक महानगरपालिका क्षेत्रात शासकीय व निमशासकीय कार्यालयात देवी देवतांचे फोटो व धार्मिक विधी करणाऱ्यावंर कार्यवाही केली होती. याचा अर्थ शासकीय अधिकारी कर्मचारी फक्त नियम सर्वसामान्य लोकांना सांगतात स्वतः मात्र त्याचे उलंघन करतात. आणि हे उलंघन केवळ धर्माच्या नावासाठी अंधविश्वास जोपासण्यासाठी असेल तर देशासाठी खुप घातक आहे. शासनाच्या नियमांचे पालन न करता धार्मिक सन उत्सव शासकीय ठिकाणी साजरे करणाऱ्या लोकांच्या मनात देश व जनता यांच्या साठी आपुलकी नसते हेच सिद्ध होते.धर्म आणि विचारधारा हा खुप मोठा व चर्चेचा विषय आहे. परंतु अनेक लोक म्हणतात केवळ हिंदु धर्मावरच लोक का बोलतात हिंदु धर्मावरच टिका का करतात. तर याचे एकमेव उत्तर आहे धर्म हि खाजगी बाब आहे ती वैयक्तिक पातळीवर वापरणे गरजेचे आहे. शासकीय किंवा सार्वजनिक पातळीवर आणली तर टिका टिप्पणी होणारच. शासकीय ठिकाणी गणेशोत्सव, लक्ष्मी पुजन करणारे लोक इदच्या दिवशी नमाज पठण करतात का? स्वतः चा बाबु आणि दुसऱ्याच ते कारटं हि मानसिकता मोडीत काढून शासकीय कर्मचारी अधिकारी समजदार व बुद्धिमान असतात हे त्यांनी त्यांच्या वर्तनातुन सिद्ध करावे. शासनाचे पत्र असूनही जर शासनाचे च शासकीय कर्मचारी ऐकत नसतील तर शासकीय कर्मचारी व अधिकारी यांच्या कडे सर्वसामान्य लोकांनी कोणत्या नजरेमधुन बघावे? सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतील अनेक लोक धर्माच्या नावाखाली अंधविश्वास, पाखंड, थोतांड जोपासतात जे विज्ञान व माणुसकी आणि तर्काला धरून नसते. अशा गोष्टी शासकीय पातळीवर होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. शासकीय व निमशासकीय ठिकाणी काय करू नये या संदर्भात पत्र काढुनही कर्मचारी व अधिकारी यांना कदाचित पत्रातील मजकूर कळाला नसेल म्हणुन ३१ डिसेंबर २०२१ रोजी सामान्य प्रशासन महाराष्ट्र शासनाने एक पत्र पुन्हा काढले आणि त्यामध्ये यादीच दिली. शासकीय व निमशासकीय कार्यालयात यादीत समाविष्ट असलेलेल्याच गोष्टी तुम्ही शासकीय पातळीवर साजऱ्या करा. त्या यादीमध्ये गणेशोत्सव, दहिहंडी सत्यनारायण लक्ष्मी पुजन असा कोणताही उल्लेख नाही तरीही गणेशोत्सव, दहिहंडी किंवा इतर धार्मिक सन उत्सव शासकीय ठिकाणी साजरे होत असतील तर हा बदमाश पणा नाही तर काय आहे? शासकीय पातळीवर महापुरूषांच्या जयंती कार्यक्रम साजरे करण्याचे आदेश असुनही बऱ्याच शासकीय कर्मचाऱ्यांना महापुरुष हे जातीचे वाटतात. धार्मिक सन उत्सव हे सार्वजनिक वाटतात. महापुरूषांच्या जयंती कार्यक्रम सार्वजनिक साजरे व्हायला पाहिजे आणि धार्मिक सन उत्सव हे वैयक्तिक वा खाजगी पातळीवर साजरे होणे गरजचे असून देशातील बरेच शासकीय कर्मचारी मानसिक गुलाम असल्याने सत्याचा स्विकार न करता काल्पनिक बाबींना सत्य मानतात व सत्य बाबींचा स्विकार करत नाहीत. यामुळे देशात धर्मांधता वाढत आहे. शासकीय पातळीवर धार्मिक सन उत्सव साजरा करणे हे कायदेशीर व नैतिक दोन्ही दृष्टीने चुकिचे आहे तरीही साजरे केले जातात. सध्या गणेशोत्सव बहुतांश शासकीय कार्यलय व संस्थेत साजरा केला जातो. परंतु मुस्लिम लोक मुर्तीपुजा मानत नाहीत, बौद्ध लोक नास्तिक आहेत, जैन लोक महाविर यांना तर ख्रिश्चन लोक केवळ येशुला माणतात मग शासकीय ठिकाणी गणेशोत्सव साजरा करणे म्हणजे इतर धर्माची मुस्कटदाबी नाही का? मुळात प्रश्न हाच आहे की धर्म कोणताही असो कायद्यासमोर सर्व सारखे आहेत.. आणि कोणत्याही धर्मातील लोकांना पुजा, उपासना करण्याचा अधिकार आहे म्हणून सार्वजनिक ठिकाणी धर्म विषयावरुन वाद होणार नाही म्हणून नैतिक दृष्टीने व शासकीय दृष्टीने आवश्यक आहे. सरकारी कर्मचारी अधिकारी हे जनतेचे सेवक व सरकारचे प्रतिनिधी असतात. म्हणून त्यांनी कार्यालयात वागतानाही सुद्धा कोणत्याही धर्माची प्रत्यक्ष दर्शी ओळख होईल असे वागु नये. कार्यालयीन वेळ संपल्यावर प्रत्येक जन आपल्याला धर्मानुसार काहीही करायला स्वतंत्र आहे. परंतु हे करतानाही सुशिक्षीत असणाऱ्यांनी अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी थोतांड याचा संबध धर्माशी जोडू नये. उठसूट कोणत्याही बाबी धर्माशी जोडून वैचारिक दृष्टीने गुलाम व धार्मिक दृष्टीने अंध बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे तो विषय जरी वेगळा असेल तरीही धार्मिक सन उत्सव कोणत्याही धर्माचे हे शासकीय पातळीवर, शासकीय कार्यालये, संस्था येथे साजरे करणे चुकिचेच आहे. अपेक्षा आहे स्वतः ला सुशिक्षित व समजदार समजणारा नोकरदार वर्ग काही गोष्टी नैतिक व शासकीय पातळीवर समजून घेतील. व भविष्यात शासकीय कार्यालय व संस्थेतून धर्मांधता बाहेर पडेल हिच अपेक्षा..

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# पर्यटनातील फिनिक्स भरारी

सचिन तेंडुलकरला क्रिकेटमध्ये, लता मंगेशकर यांना गायनामध्ये, तर अमिताभ बच्चन यांना अभिनय क्षेत्रात दैवत्व प्राप्त झालेले आहे. याला कारण म्हणजे त्यांनी निवडलेले क्षेत्र हा त्यांचा श्वास होता. पर्यटन हा तिचा श्वास आहे. त्यामुळेच पर्यटन म्हटले की, एक नाव आपसूक तोंडावर येते वीणा वर्ल्ड आणि वीणा वर्ल्डच्या वीणा पाटील यांचे. वीणा पाटील यांचा जन्म जागतिक पर्यटन दिनाच्या पूर्वसंध्येला २६ सप्टेंबर १९६४ रोजी झाला. केसरी टूरचे संस्थापक केसरीभाऊ पाटील यांची ती सर्वात मोठी मुलगी आहे. सोमय्या कॉलेज, मुंबई येथून इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर. १९८४ च्या सुरुवातीला ती केसरीमध्ये रुजू झाली. पुढे २०१३ साली वीणा पाटील यांनी स्वतःची ‘वीणा वर्ल्ड’ सुरू केली. असं म्हणतात की, एक महिला दुसऱ्या महिलेला पुढे जाऊ देत नाही अथवा मदत करत नाही. पण वीणा पाटील म्हणतात की, सगळ्या महिलांनी त्यांना मदत केली कारण वीणा वर्ल्डची पहिली टूर ही लेडीज स्पेशल होती आणि त्याला महिलांनी उदंड प्रतिसाद दिला. ‘वीणा वर्ल्ड’ हे नाव राज ठाकरे यांनी सुचवले आहे. वीणा पाटील यांच्या राहत्या घरी वीणा वर्ल्डच्या कामाची सुरुवात झाली. मराठी माणसांची आवड, त्यांचा कल आणि प्राधान्य लक्षात घेता वीणा पाटील यांनी पहिल्यांदा मराठी माणसांसाठी, मराठी टूर मॅनेजरसह युरोप, अमेरिका टूर्स सुरू केल्या म्हणून आज अनेक मराठी टूर ऑपरेटर्स युरोप–अमेरिका टूर्स करताना दिसतात आणि त्यामुळे पर्यटक ‘वीणा वर्ल्ड’सोबत जाणे पसंत करतात. साधारणपणे ३०–३५ लोक रोज सकाळी ९ ते सायंकाळी ७ काम करत असत. त्यानंतर वीणा पाटील त्यांच्याकडे असलेल्या खानसामाच्या मदतीने स्वतः काही खायला करत असत. ते दिवस म्हणजे हरिश्चंद्राची फॅक्टरी. ते सारे आठवले की, वीणा पाटील आजही त्या आठवणींच्या गावी काही काळ स्थिरावतात आणि त्यावर भरभरून बोलतात. पुढे कामाचे स्वरूप वाढले आणि वसई विकास बँकेने ना नफा ना तोटा या तत्त्वाने ६ कोटी कर्ज मंजूर केले आणि पर्यटकांच्या विश्वासातून १ वर्षात रीतसर ते फेडू शकले. आज वीणा वर्ल्डच्या प्रवासाबद्दल प्रत्येक मराठी माणूस जाणून आहे. तेथील प्रत्येक शिलेदाराने ध्येय ठेवून जिद्दीने, मेहनतीने वीणा वर्ल्ड एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे.




माणूस हा फक्त पैशासाठी काम करीत नाही, तर तो आपल्या कामामध्ये आपले समाधान शोधत असतो आणि हेच कारण आहे की, वीणा वर्ल्डमधील प्रत्येक कर्मचारी एकमेकांत बांधले गेले आहेत. या क्षेत्रांत नव्याने उद्योग करू इच्छिणाऱ्यांना त्या सांगतात की, ध्येय निश्चित करा, त्या ध्येयाकडे जाण्याचा मार्ग ठरवा आणि मग जिद्दीने मार्गक्रमण करायला शिका. अडचणींची पायरी व्हा, अडथळ्यांचा आधार घेऊन उडी मारा आणि संकटांचे संधीत रूपांतर करा ही त्यांची शिकवण आहे. आपल्या घरचा संवाद जाणीवपूर्वक, विचारपूर्वक असावा याबद्दल त्या आग्रही आहेत. त्यातून आत्मविश्वास निर्माण होईल आणि सहज बदल घडू शकेल हा त्यांना विश्वास आहे. कुठल्याही परिस्थितीत निर्णय घेण्याची क्षमता वाढवता आली पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. माझ्या स्पर्धकांनी माझी अधिकाधिक कॉपी करावी म्हणजे मला अधिक नवं सुचत जातं. वीणा पाटील यांचे हे वाक्य खूप काही शिकवून जाते.

कोरोनाचा सगळ्यात पहिला फटका हा पर्यटन व्यवसायाला बसला आणि या धक्क्यातून सर्वात शेवटी जर कोणता व्यवसाय सावरला असेल, तर तो पर्यटनच आहे. कोरोनाचा प्रसार जगभर ज्या पद्धतीनं झाला आहे, ते पाहता लोकांच्या मनात प्रवासाची भीती बसली होती. त्यामुळे सगळं रुळावर आलं तरी लोक लगेचच फिरायला बाहेर पडले नाहीत, हे वास्तव आहे. किमान वर्षभर लोक बाहेर पडतील की नाही, याबद्दल शंका होती. पण थोडं सुरळीत झालं असताना एका महिन्यात दहा हजार बुकिंग वीणा वर्ल्डमध्ये झाल्या. शेवटी मर्यादित क्षमता लक्षात घेता अनेकांना थांबवावे लागले. हा खऱ्या अर्थाने वीणा पाटील यांच्या ‘वीणा वर्ल्ड’वरचा विश्वास होता.

आमूलाग्र बदल घडवत जिद्दीने त्यांनी वीणा वर्ल्डचा आलेख सतत चढता ठेवला आहे. सतत काहीतरी नवीन देण्याचा त्यांचा प्रयत्न पर्यटकांना ‘वीणा वर्ल्ड’कडे आकर्षित करणारा आहे. आज त्यांचे सहकारी, मित्र, वेगवेगळे उद्योग, व्यवसाय करून आर्थिक अडचणींवर मात करत आहेत. कारण त्या म्हणतात की, रिकामे बसू नये. त्याने मनात वेगवेगळे विचार येतात. आज आलेल्या अडचणींवर मात करण्याची आवश्यकता आहे. आपल्या यशाचे श्रेय त्या आपले सहकारी यांच्यासोबत आपल्या कुटुंबाला देखील देतात. आई–बाबांच्या संस्कारामुळे त्या घडल्या. उद्योजिका बनल्या, यजमान सुधीर पाटील यांच्यामुळे उद्योजकीय कक्षा रुंदावल्या. त्यांनी संपूर्ण कुटुंबाची काळजी घेतली, कारण वीणा पाटील यांचे वर्षातले निम्मे महिने विमान प्रवासात असायचे. त्यांची मुले नील आणि राज लहान असताना त्यांना कधीही आई घरात नाही, याची उणीव भासली नाही कारण, त्यांना घरातून संस्कार मिळाले होते की आई कामानिमित्त, पैसे कमवण्यासाठी बाहेर आहे आणि आज वीणा पाटील म्हणजे पर्यटन हे समीकरण दृढ झाले आहे.

‘लेडी बॉस’ कशी असावी अन् कशी दिसावी, याचं मूर्तिमंत उदाहरण वीणा पाटील आहेत. फिनिक्स पक्ष्याप्रमाणे उद्योगविश्वात त्यांनी घेतलेली यशाची भरारी कोणत्याही उद्योजकासाठी प्रेरक आहे.

# निलंगेकर यांच्या जलसाक्षरता रॅलीचे रेणापूर तालुक्यात जोरदार स्वागत

लातूर : – लातूर जिल्हा कायम दुष्काळाशी सामना करतोय सातत्याने कमी, जास्त पाऊस होत असल्याने प्रत्येक वर्षी शेतकऱ्यासह सर्वांनाच अडचणींना तोंड द्यावे लागते. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुरू केलेले जलसाक्षरता अभियान अत्यंत महत्त्वाचे असून जोपर्यंत लातूर जिल्ह्याला हक्काचे पाणी मिळणार नाही तोपर्यंत आर्थिक स्थैर्य प्राप्त होणार नाही, कायमचा दुष्काळ हटणार नाही असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ,. रमेशआप्पा कराड यांनी केले.

समुद्रात वाहून जाणारे हक्काचे पाणी लातूर जिल्ह्याला मिळावे यासाठी आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुरू केलेल्या जलसाक्षरता रॅलीचा लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात प्रवेश होताच भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील कार्यकर्त्यांनी त्याचबरोबर रेणापूर आणि खरोळा येथील सर्व स्तरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत जोरदार स्वागत केले.

पिण्यासाठी, शेतीसाठी आणि उद्योगासाठी लातूर जिल्ह्याला हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे त्याशिवाय भवितव्य नाही. याबाबत जिल्ह्यातील जनतेत जनजागृती व्हावी जनतेचा पाठिंबा मिळावा यासाठी आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी संपूर्ण जिल्हाभर बाईक रॅलीच्या माध्यमातून प्रवास करत आहेत. या रॅलीत ५०० ते ६०० बाईकस्वार सहभागी झाले होते.

अहमदपूर, चाकूर तालुक्याचा प्रवास करून रेणापूर तालुक्यात रॅंलीने प्रवेश करताच खरोळा येथे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली लातूर ग्रामीण मतदार संघाच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. रेणापूर आणि खरोळा येथे जलसाक्षरता रॅलीचा जाहीर कार्यक्रम झाला. यावेळी मार्गदर्शन करताना आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, पाणी हे जीवन आहे. भविष्यात होणारे तिसरे महायुद्ध पाण्यासाठीच होईल. मराठवाडा आणि त्यातही लातूर जिल्ह्यात तर आजच महायुद्धासारखी परिस्थिती आहे. जिल्हा पाण्यासाठी स्वयंपूर्ण असणे गरजेचे आहे. भविष्यात ओढवणारे संकट ओळखून जलसाक्षरता अभियानात सहभागी व्हा. पाण्यासाठी होणारे तंटे थांबविण्यासाठी साथ द्या, असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी केले.

यावेळी बोलताना आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, मराठवाड्याचा अमृत महोत्सव नुकताच आपण साजरा केला. गेल्या ७५ वर्षात आपण अनेक गावांना शहरांना पिण्याच्या पाण्याची सोय करू शकलो नाहीत. ही शोकांतिका आहे संघर्ष केल्याशिवाय काहीच मिळत नाही. कधी पाऊस जास्त होतो तर कधी कमी होतो त्यामुळे पिकाचे सातत्याने नुकसान होत असून बारमाही शेतकऱ्यांसाठी पाणी मिळाले पाहिजे. संभाजीरावांनी हाती घेतलेले हे अभियान सर्वांच्या भवितव्याच्या हिताचे असून मराठवाड्याचा लातूर जिल्ह्याचा मागासलेपणा घालविण्यासाठी हक्काचे पाणी मिळाले पाहिजे. त्याशिवाय आर्थिक स्थैर्य प्राप्त होणार नाही. संभाजीराव






निलंगेकर यांनी सुरू केलेल्या या अभियानाला जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यांनी शेवटपर्यंत संघर्ष करावा असेही आ. कराड यांनी बोलून दाखविले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके पाटील, भाजपाचे अरविंद पाटील निलंगेकर, विक्रमकाका शिंदे, अमोल पाटील, संजय दोरवे, जिल्हा उपाध्यक्ष अनिल भिसे, सतीश आंबेकर, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष अॅड. दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, दत्ता सरवदे यांच्यासह रेणापुर खरोळा येथील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते सर्व स्तरातील नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते, सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

# लातुरात राज्यस्तरीय वीरशैव लिंगायत वधू – वर परिचय मेळाव्याचे आयोजन : उमाकांत कोरे

लातूर : वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूरच्या वतीने येत्या दि. १९ नोव्हेंबर २०२३ रोजी लातुरात ११ व्या राज्यस्तरीय वीरशैव लिंगायत वधू – वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मेळाव्याचे संस्थापक उमाकांत कोरे यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना दिली.

वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूरच्या वतीने मागील सलग ११ वर्षांपासून राज्यस्तरीय वधू –वर परिचय मेळाव्याचे सातत्याने आयोजन केले जाते. हा मेळावा पूर्णतः निः शुल्क म्हणजे मेळाव्यात नाव नोंदणीसाठी अथवा अन्य कोणत्याही बाबीसाठी शुल्क आकारला जात नसल्याचे सांगून उमाकांत कोरे म्हणाले की, हा मेळावा कै. राष्ट्रसंत प.पू. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या स्मरणार्थ आणि प.पू. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या कृपाशीर्वादाने संपन्न होणार आहे. मागच्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यास अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला होता. मागच्या वर्षी दिड हजार वधू – वरांच्या नोंदणीचे उद्दिष्टय ठेवण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात १ हजार ९०० नोंदी झाल्या होत्या. वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या वधू – वर परिचय मेळाव्यात हा एक विक्रमच असल्याचे त्यांनी सांगितले. या मेळाव्यात लातूर जिल्ह्यासह राज्यातील अन्य जिल्ह्यातील जास्तीत जास्त उप वधू – वरांना आपली नाव नोंदणी करता यावी यासाठी त्या– त्या जिल्ह्यात नाव नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. सध्या प्रचलित असणाऱ्या सोशल मिडीयाच्या माध्यमातूनही विहित नमुन्यातील फॉर्ममध्ये सर्व आवश्यक ती माहिती भरून पाठविल्यास नोंदणी केली जाणार आहे. मेळाव्यासाठी उपस्थित वधू – वर , त्यांच्या नातेवाईकांसाठी वॉटरप्रूफ मंडप, एलईडी वॉल,मोफत भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. मागच्या वर्षीच्या मेळाव्यात नाव नोंदणी केली होती,पण ज्यांचे विवाह अद्याप जुळले नाहीत त्यांनी यावेळी पुन्हा नोंदणी करणे आवश्यक असल्याचे कोरे यांनी सांगितले. यावर्षीच्या मेळाव्याचे अध्यक्ष अभिषेक उर्फ तम्मा चौंडे यांनी ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली हा मेळावाही प्रतिवर्षाप्रमाणे अत्यंत यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त केला. मेळाव्याचे स्वागताध्यक्ष एड. योगीराज कल्याणी, शिवशरण बिराजदार , कार्यवाह बालाजी पिंपळे, पुनर्विवाह प्रमुख विवेक जानते यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. मेळाव्याच्या कार्याध्यक्षपदी प्रेरणा होनराव व अप्पासाहेब घुगरे यांची



निवड करण्यात आली आहे. यावर्षीच्या मेळाव्यात तीन हजार पेक्षा अधिक वधू – वरांच्या नोंदणीचे उद्दिष्ट्य ठेवण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. हा मेळावा रविवार, दि. १९ नोव्हेंबर २०२३ रोजी वीरशैव समाज सांस्कृतिक भवन, खंडोबा गल्ली, औसा हनुमान जवळ लातूर याठिकाणी संपन्न होणार आहे. या पत्रकार परिषदेस बाबुराव राचट्टे ,चंद्रकांत बावगे, सुनील भीमपुरे, गणेश कोरे, सागर मांडे, भीमाशंकर बेंबळकर, एड. सुमित झिंजोरे , आशिष स्वामी, मन्मथ बोळेगावे, वैभव विभुते, चंद्रशेखर वडजे, दत्ता माकणे, एड. पंकज कोरे, महेश कोरे, संतोष कोरे, प्रसाद नागुरे ,शिवकुमार महाजन, एड. वैजनाथ धुळे, अविनाश रासुरे यासह मान्यवर उपस्थित होते.

# उदगीर येथील वीरशैव वधू–वर परिचय मेळाव्यास उत्स्फुर्त प्रतिसाद

उदगीर : लिंगायत महासंघ शाखा उदगीरच्यावतीने रविवार दि.२४ सप्टेंबर २०२३ रोजी शिवपार्वती मंगल कार्यालय, उदगीर येथे लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या वधूवर परिचय मेळाव्यास वधूवर व पालकांनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला असल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले. या वधू–वर मेळाव्यात ५०० वधूवरांनी व असंख्य पालकांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाची सुरूवात लिंगायत महासंघ व अनुभवमंटप निलंगा येथील महिलांनी सामुहिक इष्टलिंग पुजा, प्रार्थना व महात्मा बसवेश्वरांच्या वचनांचे पठन करून केली. या कार्यक्रमाचे उद्घाटन कर्नल सचिन रंडाळे यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार हे होते. यावेळी गोताळा हत्याकांडात निर्दोष असुनही जन्मठेपेची शिक्षा भोगलेल्या गणेश गुळवे गुरूजींचा सत्कार करण्यात आला. या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून शंभुलिंग शिवाचार्य महाराज(हावगीस्वामी मठ, उदगीर), किर्तनकेसरी शि.भ.प.भगवंतराव पाटील चांभरगेकर, किर्तनकार मंडळाचे प्रदेशाध्यक्ष शि.भ.प.शिवराज नावंदे गुरूजी, लाडेकर महाराज, येरोळकर महाराज यांच्यासह माजी आ.मनोहर पटवारी, बीआरएस पार्टीचे जिल्हा समन्वयक अॅड.मल्लिकार्जुन करडखेलकर, सहयोग बॅंकेचे चेअरमन रमेश अंबरखाने, अॅड.सुरेश पाटील चिघळीकर, मल्लिकार्जुन मानकरी, नागनाथप्पा भुरके, राजाराम पाटील, सिद्रामप्पा पोपडे, विश्वनाथप्पा मिटकरी, लिंगायत महासंघाचे लातूर जिल्हाध्यक्ष करीबसवेश्वर पाटील, उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष शंकरराव पाटील गुंजोटिकर, सांगली जिल्हाध्यक्ष प्रा.अशोक सावळे, लिंगायत महासंघाचे जिल्हा संघटक काशीनाथ मोरखंडे, प्रा.विठ्ठल आवाळे, चंद्रकांत तोळमारे, गणेश पटणे, निळकंठ शिवणे, सुभाष शंकरे, धिरज माकणे, संजय पाटील, चंद्रकांत डांगे, अशोक काडादी, प्रभाकर चोचंडे, शिवानंद भुसारे, महेश भिंगोले, निलेश करंजे, प्रा.मधुबाला हुडगे, दत्तात्रय बिराजदार, शिवशंकर बिडवे, वैजनाथ जट्टे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील, तालुकाध्यक्ष चंद्रकांत शिरसे, शहराध्यक्ष सुभाष शेरे, जिल्हा उपाध्यक्ष बस्वराज




ब्याळे, राजकुमार वडले, महेश धोंडीहिप्परगेकर, संतोष खरोबे, भिमाशंकर शेळके, संजय शिवशेट्टे, समशेट्टी बिरादार, सत्यवान बिरादार, काशीनाथ द्याडे, बापुराव शेटकार, रेवणप्पा बारूळे, अशोक तोंडारे, कालिदास शिरसे, बसवराज विश्वनाथ, प्रा.प्रकाश करीअप्पा यांच्यासह असंख्य पदाधिकार्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिवसांब स्वामी, संजय शिवशेट्टे व महेश धोंडीहिप्परगेकर यांनी तर प्रास्ताविक लिंगायत महासंघाचे लातूर शहराध्यक्ष प्रा.वैजनाथ मलशेट्टे यांनी केले. तर आभार लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष बस्वराज ब्याळे यांनी मानले.

# कै.ड.देविदासराव जमदाडे प्रबोधन व विचारमंचचे राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्कार घोषित

लातूर – कै.ड.देविदासराव जमदाडे प्रबोधन व विचारमंच, लातूरच्या वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्काराची घोषणा विचारमंचचे मुख्य संयोजक डॉ. संजय जमदाडे यांनी केली.

२०२३ च्या पुरस्कारासाठी एकूण ११ जणांची निवड करण्यात आली. त्यात, डॉ.लक्ष्मीकांत दामा, सोलापूर,प्राचार्य (प्रो.) डॉ. श्रीधर कोल्हे, लातूर,प्रा. डॉ.गंगाधर बिराजदार, सोलापूर,डॉ.दीपक वेदपाठक, लातूर,डॉ.गोरोबा खुरपे, जळकोट,डॉ. श्रीराम गव्हाणे, नांदेड,डॉ. हर्षवर्धन कोल्हापुरे, लातूर,सुनीता बोरगावकर–सावंत, लातूर,नितीन माशाळकर, नळेगाव, मा. सविता धर्माधिकारी, कासारखेडा,मा. नीता कदम, टाकळी ब. यांचा समावेश आहे.



डॉ.राजशेखर सोलापुरे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने या अकरा शिक्षक व प्राध्यापकांची निवड केली आहे.

राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्काराचे वितरण रविवार दिनांक १ ऑक्टोंबर २०२३ रोजी लातूर येथील जयक्रांती महाविद्यालयाच्या सभागृहात डॉ. संतोष जमदाडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि एम. आय. एम. एस. आर. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नवाब जमादार, प्राचार्य प्रशांत घार प्रसिद्ध वक्ते आणि लेखक डॉ.राजशेखर सोलापुरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे असे आवाहन विचारमंचच्या वतीने डॉ.संतोष जमदाडे व डॉ. संजय जमदाडे यांनी केले आहे.

# अपात्रतेचा निकाल यावर्षी नाहीच, पुढिल सुनावणी १३ ऑक्टोबरला

मुंबई : शिवसेना आमदार अपात्र प्रकरणाची आजची सुनावणी पुर्ण झाली असून ठाकरे–शिंदे या दोन्ही बाजूंकडचा युक्तीवाद संपला आहे. दरम्यान अध्यक्षांनी आता १३ ऑक्टोबरला सुनावणी होणार असल्याची माहिती दिली. यासाठीचे एक वेळापत्रकही समोर आले आहे. त्यातील तपशीलानुसार, यावर्षी या प्रकरणाचा निकाल लागणे कठीण असल्याचे दिसून येत आहे.

सुप्रीम कोर्टानं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना सुना–वणीला उशीर होत असल्याच्या कारणावरुन फटकारल्यानंतर आज पुन्हा सुनावणीला सुरुवात झाली. याच वेळापत्रकही समोर आलं आहे. ज्यामध्ये कागदपत्रे तपासणी, साक्ष नोंदवणे आणि आमदारांची उलट तपासणी करणे याचा समावेश आहे. संबंधित प्रकियेला किमान तीन महिन्यांचा अवधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल यावर्षी लागण कठीण असल्याचं बोललं जात आहे.

३४ याचिकांवर होणार सुनावणी

या तीन महिन्यानंतर डिसेंबर महिन्यात हिवाळी अधिवेशन असल्यानं ही सुनावणी पूर्ण होण्याची शक्यता धूसर आहे. यामध्ये ३४ याचिका आहेत.

# जाकेर खान, विकास लंगोटे यांच्या सत्कार.

परभणी :– गोरगरीब मागासवर्गीय अल्पसंख्यांक आणि सर्व जाती धर्मातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवण्यासाठी सदैव कार्यतत्तर असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या मनपाच्या गटनेते माजी श्री जाकीर अहमद उर्फ झाकीर खान यांची शहर जिल्हा अध्यक्षपदी तर विकास प्रभाकर लंगोटे यांचे शहर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे या नियुक्तीचे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे शहर जिल्हा सेवा दलाचे संघटक लुक मान खान सुलेमान खान गुत्तेदार



शेख अस्लम भाई प्रसिद्ध समाजसेवक साजिद अन्सारी तसेच राष्ट्रवादीचे नेते शेख बशीर शेख फरीद उर्फ दलाल तसेच इतर मान्यवरांनी या दोघांचा नियुक्ती बद्दल सत्कार केला

# दयानंद विज्ञानमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी




लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२५ सप्टेंबर २०२३ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,महेंद्र कोराळे,विनोद घार,विष्णू नाईकवाडे,मोहसीन शेख,किशोर जाधव,सतिश तांदळे,दिलीप राठोड,सुदाम सातपुते,शेषराव बिराजदार,अभिजीत हाके,रजनीकांत मदने,सुनील राक्षे,बाबासाहेब बचाटे,तेजस काळे,अमोल क्षिरसागर,बाळू चौगुले,अभिजीत सावरे,रोहित काळे,माळी यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# ल..र. फाउंडेशनचे राज्यस्तरीय पुरस्कार साहित्यिकांना प्रदान.

लातूर. :– ल.र. फाउंडेशनचे राज्यस्तरीय स्मृती साहित्य पुरस्कार प्राप्त लेखकांना रविवार दि. २४ सप्टेंबर २०२३ रोजी प्रदान करण्यात आला.हा समारंभ ऑफिसर्स क्लब, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय शेजारी, बार्शी रोड लातूर येथे संपन्न झाला. मराठी साहित्यातील विविध वाङमय प्रकारात उत्कृष्ठ लेखन करणाऱ्या महाराष्ट्रातील लेखकांच्या साहित्यकृतीला ल. र. फॉउंडेशनच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप आकर्षक असे स्मृती चिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम असे होते.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास अध्यक्ष म्हणून डॉ. नागोराव कुंभार तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवी प्रा. इंद्रजीत भालेराव, मुस्लिम साहित्याचे अभ्यासक प्रा फ.म.शहाजिंदे आणि प्रमुख उपस्थिती मध्ये रचनापर्व ब्लॉगर तथा कवी प्रताप वाघमारे तहसीलदार, नागपूर,सुप्रसिद्ध समाज विश्लेषक लेखक डॉ. विवेक घोटाळे, डॉ. अजय जाधव, मोहसीन खान, डॉ. जयद्रथ जाधव, डॉ. रंणजित जाधव प्रा. डॉ. सुधीर मुंगळे, डॉ रिना जैस्वाल, श्रीमती सुहास मैदरकर उपस्थित होते .

कथा, कादंबरी, चरित्र – आत्मचरित्र, वैचारक, समीक्षात्मक, संकीर्ण अशा विविध वाङमय प्रकारात उत्कृष्ठ साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यकृतीला ल. र. फॉउंडेशनचा राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार सुप्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव यांच्या हस्ते देण्यात आला. अमोल विनायकराव देशमुख, परभणी 'आठ फोडा आन बाहेर फेका', पार्वतीसूत काव्य पुरस्कार. आनंद जांबुवंतराव कदम, नांदेड'वटभरणाच्या रात्री', कै. रमाकांत करंजे कथा पुरस्कार, डॉ.श्रीकांत श्रीपती पाटील, कोल्हापूर 'पाणी फेरा' कै. वनमाला सरकाळे कादंबरी पुरस्कार. डॉ. संभाजी पाटील, लातूर. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता', कै.सचिन नागोराव कुंभार वैचारिक लेखन पुरस्कार. सचिन वसंत पाटील. सांगली 'पाय आणि वाटा' कै. डॉ. विजय मैंदरकर ललित लेख पुरस्कार. प्रा. डॉ.किसन शंकरराव माने, सांगोला 'राजकीय मानदंड : भाई गणपतराव देशमुख' कै. लिलादेवी जैस्वाल चरित्रात्मक लेखन पुरस्कार. डॉ.प्रतिभा जाधव /अलका कुलकर्णी, नाशिक 'विचार पेरत जाऊ' कै.उमाकांत हिंगणे संकीर्ण पुरस्कार. एकनाथ आव्हाड, मुंबई 'खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा' शहीद विवेकानंद भोसले बालसाहित्य पुरस्कार. डॉ.अनंता सूर, यवतमाळ 'राजर्षी शाहू महाराजांची निवडक सोळा भाषणे' कै. अशोक मेळकुंदे संशोधनात्मक लेखन पुरस्कार. डॉ. सुहासकुमार बोबडे, कराड शिक्षण चिंतन शिक्षणविषयक वैचारिक चिंतन कै. श्रीपती मुकुंदराव सोनवणे समीक्षात्मक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यमाचे प्रास्ताविक डॉ. हंसराज भोसले यांनी केले. ल.रा फाउंडेशनची भूमिका डॉ. उमाकांत जाधव यांनी मांडली. सन्मानित साहित्यिकांचे मनोगत प्रा. डॉ.किसन माने यांनी मांडले. यावेळ कवी इंद्रजित भालेराव यांनी आपल्या माय – लेक आणि काट्या कुट्याचा तुडवीत रस्ता या प्रसिद्ध कवितेच्या सादरीकरणा बरोबरच साहित्यामुळे कवितेमुळे मनातील सर्व विकार नाहीसे होऊन आनंदी जीवन जगण्यासाठी साहित्य, कविता महत्वाचे माध्यम असल्याचे मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. फ.म.शाहाजींदे, कवी तहसीलदार प्रताप वाघमारे, डॉ,अजय जाधव यांनी शुभेच्छा पर मार्गदर्शन केले. कार्यकमाचा समारोप अध्यक्ष डॉ.नागोराव कुंभार यांनी केला. याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात पुरस्काराला प्राप्त लेखक डॉ. किशन माने आणि परीक्षकाची भूमिका डॉ. ज्ञानदेव राऊत यांनी मांडली.

फॉउंडेशन च्या वतीने परीक्षक प्रा.डॉ.जयद्रथ जाधव, प्रा.डॉ.ज्ञानदेव राऊत. प्रा.सुरेंद्र पाटील. प्रा.डॉ. दुष्यंत कठारे.प्रा.डॉ. भरत देशमुख प्रा.डॉ. सुधीर मुंगळे. प्रा.डॉ.रणजीत जाधव.सौ. अंजली सूर्यवंशी.डॉ. नरसिंह सोपानराव वाघमोडेविवेक सोताडेकर इत्यादीना मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले तर संयोजनात महत्वपूर्ण सहकार्य करणाऱ्या तानाजी माने ,विकास सरकाळे शिवाजी हंडे ,बलभीम कोथिंबिरे एस वाय कुलकर्णी यांचा ही मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यमाचे सुत्रसंचलन डॉ.नरसिंग वाघमोड, यांनी केले तर आभार विवेक सौताडीकर यांनी मानले.

ल.र. फाउंडेशन राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार संयोजन समितीतील , व्यंकट खटके, डॉ. उमाकांत जाधव, डॉ . हंसराज भोसले, डॉ. नरसिंह वाघमोडे, प्रकाशक योगिता जाधव, विकास करंजे, डॉ. सितम सोनवणे, श्री तानाजी माने.आदिनी परिश्रम घेतले तर डॉ. भरत देशमुख, डॉ.जयद्रथ जाधव.प्रा.डॉ.ज्ञानदेव राऊत. प्रा.सुरेंद्र पाटील. प्रा.डॉ. दुष्यंत कठारे,प्रा.डॉ. सुधीर मुंगळे.प्रा.डॉ.रणजीत जाधव.सौ.अंजली सूर्यवंशी.डॉ. नरसिंह वाघमोडे . श्री विवेक सौताडेकर यांच्या परीक्षनाच्या महत्वपूर्ण योगदानातून ल. र. फॉउंडेशन राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार कार्यक्रम यशस्वी झाला.

# सत्यशोधक समाजच्या १५० वा स्थापना दिवस व संविधान सन्मान समारोह संपन्न

दिल्ली दि. २४ :- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे गुरू राष्ट्रपिता महात्मा जोतिराव फुले यांची विचारधारा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर महाराष्ट्रात बाबासाहेब व महात्मा फुले यांची विचारधारा आंबेडकर अनुयायांनी चालवली मात्र ओ बी सी समाजाने तितकीशी चालवली नाही ,महात्मा फुले यांचे विचार वाढविण्यासाठी आता उत्तर भारतात पुढाकार घेणे आवश्यक आहे असे सांगून महात्मा फुले यांनी १जानेवारीला पहिली शाळा भीमा कोरेगाव ची पेशवाही विरुद्धची लढाई जिंकलेल्या दिवशी केली व त्यांनीच छत्रपती शिवाजी महाराज यांची रायगड वरील समाधी शोधली आणि पहिला पोवाडाही लिहिला आहे.महापुरुष यांचा विचार घेऊन एकत्र जावे लागेल,८५ टक्के लोक एकत्र आले तर दिल्लीतील सरकार बदलू शकतो असे प्रतिपादन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ भीमराव य आंबेडकर (ट्रस्टी /राष्ट्रीय कार्याध्यक्ष -दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया व समूह राष्ट्रीय अध्यक्ष -समता सैनिक दल ) यांनी सत्यशोधक समाज संघटनच्यावतीने सैनी भवन , सावित्रिबाई फुले ट्रस्ट ,मंगोलपुरी ,दिल्ली येथे महात्मा जोतिराव फुले यांच्या सत्यशोधक समाज या संस्थेचा १५० वा स्थापना दिवस व संविधान सन्मान समारोह कार्यक्रमात केले.

या कार्यक्रमास उत्तर प्रदेशचे माजी मंत्री



स्वामी प्रसाद मौर्य यांनी, त्यांनी हिंदू धर्माबाबत केलेल्या टिप्पणी च्या अनुषंगाने त्यांच्यावर केलेल्या आरोपांना उत्तर दिले , हिंदू धर्मात आम्ही पाळलेले प्राणी चालतात पण त्यांचे पालनपोषण करणाऱ्यांना नीच मानतात ,आपण ताकत ,चढावा ,दान ,पैसा देणे बंद करा नंतर ते आपल्याला सन्मान देतील ,भारतीय संविधानावर मनुवादी भारी पडण्याचे काम चालू आहे, आपणास सत्यावर चालावे लागेल आणि सन्मानाची लढाई सुरूच ठेवावी लागेल असेसांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राजकुमार सोनी यांनी आपल्या भाषणात हिंदू धर्माप्रमाणे आत्मा ,स्वर्ग नरक असे काही नाही असे उदाहरणासह स्पष्ट करून भगवान बुद्धांचे समतेचे विचारच पुढे घेऊन जाऊ शकतात असे सांगितले. यावेळी राजबाला सैनी यांनी सावित्रीमाईच्या वेशात मी सावित्री बोलतेय या भाषांतून महात्मा फुले व सावित्री माई यांची माहिती सांगितली. अरविंद माळी यांनी अखिल भारतीय गोलमेज परिषदेचा अहवाल सादर केला. या कार्यक्रमाचे आयोजक सत्यशोधक समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष व दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया के राष्ट्रीय संघटक अँड प्रकाश मौर्य,राजकुमार सैनी आणि सावित्रीबाई फुले ट्रस्ट यांनी केले होते.

सकाळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जेथे शेवटचा श्वास घेतला ते २६ अलीपूर निवास स्थानापासून भंते सुमित रत्न थेरो यांनी तयार केलेला संविधान रथाला डॉ भीमराव य आंबेडकर यांनी पंचशील चा झेंडा दाखऊन संविधान रथ यात्रा सुरू केली. हा रथ देशाच्या सर्व भागात फिरणार असून १कोटी संविधानाच्या प्रती घरोघर पोहचविण्याचा व संविधान जन जागृती करण्याचा संकल्प असल्याचे भंते सुमित रत्नथेरो यांनी सांगितले.

यावेळी पुण्यावरून आणलेली महात्मा फुले यांची खास पगडी उपस्थित मान्यवरांना घालण्यात आली. तसेच एस के भंडारे ,कॅप्टन प्रविण निखाडे आणि काही ओबीसी समाज कार्यकर्ते यांनी केलेल्या समाज कार्याबाबत महात्मा फुले यांची खास पगडी देऊन सन्मान करण्यात आला.

या दोन्ही कार्यक्रमास दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया /समता सैनिक दलाचे कॅप्टन प्रविण निखाडे (ट्रस्टी /आंतरराष्ट्रीय सचिव ),एस के भंडारे (राष्ट्रीय उपाध्यक्ष व स्टाफ ऑफिसर ), कपूर सिंह सिंघल( राष्ट्रीय उपाध्यक्ष ),एन पी निशांत ( मुख्य सचेतक ,समता सैनिक दल ), फौजी इंडिया (राष्ट्रीय संघटक ),मल्लिकार्जुन भालके ( राष्ट्रीय संघटक ),आर एस गौतम (राष्ट्रीय सदस्य ), कपूरसिंह सिंघल कटारिया (अध्यक्ष ,दिल्ली प्रदेश ), अँड सुरेश चंद्रा (उपाध्यक्ष ,दिल्ली प्रदेश ), संदेश मोहिते(कोषाध्यक्ष , हरियाणा ) इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमास ओबीसी समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

# आमदार धिरज देशमुख यांच्याकडून उफाडे कुटुंबियांचे सांत्वन



लातूर : लातूर पंचायत समितीचे माजी उपसभापती, टाकळी ब. येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते श्री. प्रकाश माणिकराव उफाडे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या टाकळी ब. (ता. लातूर) येथील निवासस्थानी जावून 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सोमवारी (ता. २५) उफाडे कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी रविंद्र काळे, प्रमोद जाधव, माणिकराव उफाडे, विलास उफाडे, नरेश पवार, अनिल दरकसे, वसंत उफाडे, मुन्ना शेख, रमेश घाडगे, लक्ष्मण उफाडे, बब्रुवान बोडके, अशोक उफाडे, प्रताप उफाडे, गजानन उफाडे, प्रभाकर उफाडे, भरत उफाडे, बाळासाहेब शिंदे, गजानन पाटील, रामचंद्र घाडगे, मनोज उफाडे, शशिकांत सोट पाटील, दिलीप उफाडे, दशरथ वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. श्री. प्रकाश उफाडे हे मनमिळावू सहकारी होते. त्यांनी शेवटपर्यंत जनतेची कामे केली. असा सहकारी गमावल्याने दुःख कायम मनात राहील, अशा शब्दात आमदार श्री. धिरज देशमुख यांनी यावेळी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# इस्त्रोची आता नवी चांद्र मोहीम

श्रीहरीकोटा : भारताने चांद्रयान-३ मोहीम यशस्वीपणे पार पाडून एक नवा इतिहास रचला आहे. आता यानंतर देशाची अंतराळ संशोधन संस्था इस्त्रो ही पुढील कित्येक मोहिमांवर काम करत आहे. सूर्याच्या अभ्यासासाठी आदित्य मोहीम लाँच झाली आहे. त्यासोबतच गगनयान मोहिमेची तयारीही जोरात सुरू आहे. या सगळ्यातच इस्त्रोने आणखी एका चांद्र मोहिमेचे संकेत दिले आ-हेत.

इस्त्रोच्या एका अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार, चांद्रयान-३ नंतर आता इस्त्रो आणखी एका चांद्र मोहिमेवर काम करत आहे. भारताच्या आतापर्यंतच्या चांद्र मोहिमा एकतर्फी होत्या. मात्र, आता चंद्रावरुन नमुने घेऊन परत पृथ्वीवर येण्यास सक्षम असणा-या यानावर इस्त्रो काम करत आहे. या मोहिमेसाठी इस्त्रोने अद्याप कोणतीही डेडलाईन निश्चित केली नाही. तसेच याची तयारी कुठपर्यंत आली आहे, याबाबत देखील या अधिका-याने माहिती दिली नाही. विक्रम लँडरने केलेले हॉप एक्सपेरिमेंट ही याच मोहिमेसाठीची चाचणी होती. ती यशस्वी झाल्यामुळे आता इस्त्रो मोठ्या स्तरावर काम करत आहे.

काय होती चाचणी?

३ सप्टेंबर रोजी इस्त्रोने विक्रम लँडरचे पुन्हा एकदा सॉफ्ट लँडिंग केले होते. इस्त्रोने कमांड दिल्यानंतर विक्रम लँडरने आपले इंजिन सुरू केले आणि स्वत:ला सुमारे ४० सेंटीमीटर उंचीपर्यंत वर उचलले. सोबतच तेवढेच अंतर पुढे जात पुन्हा एकदा विक्रमने सॉफ्ट लँडिंग केले होते.

जपानसोबत मोहीम

इस्त्रो भविष्यात जपानसोबत देखील एक चांद्र मोहीम राबवणार आहे. लूनार पोलर एक्सप्लोरेशन असे या मोहिमेचे नाव असणार आहे. चंद्रावर पाण्याचा आणि अन्य खनिजांचा शोध घेण्यासाठी ही संयुक्त मोहीम राबवण्यात येणार आहे.

# विकासाचे नंदनवन फुलविण्यासाठी हक्काचे पाणी आवश्यक - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर

## ना राजकारणासाठी ना जातीसाठी....

उपस्थितांशी संवाद साधताना आ.निलंगेकर म्हणाले की,हा लढा राजकारणासाठी किंवा जातीसाठी नाही.मतदार जोडण्यासाठीही नाही तर आपले हक्काचे पाणी मिळावे यासाठी आपण हा लढा सुरू केला आहे. पाणी हा प्रत्येकाचा जीवनमरणाचा प्रश्न आहे. सर्व जाती-धर्मातील नागरिकांसाठी पाणी आवश्यकच आहे.त्यामुळे आपण हा लढा सुरू केला आहे.या माध्यमातून हक्काचे पाणी पदरात पाडून घेऊ,असा आशावाद आ.निलंगेकर यांनी व्यक्त केला.

## तन मन धनाने सोबत राहू - आ.अभिमन्यू पवार

बुधोडा येथे आ. अभिमन्यू पवार यांनी औसा मतदारसंघात जलसाक्षरता रॅलीचे स्वागत केले.यावेळी बोलताना ते म्हणाले की, आ.संभाजीराव पाटील निलंगेकर हे आमचे नेते आहेत. सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांसाठी त्यांनी हे अभियान सुरू केले आहे.तन-मन-धनाने, सर्वशक्तीनिशी या अभियानात आम्ही त्यांच्या पाठीशी राहू,अशी ग्वाही आ.अभिमन्यू पवार यांनी यावेळी बोलताना दिली.

## शेतकरी पुत्र असल्याने जाणीव

- नानासाहेब जावळे पाटील

आ.संभाजीराव पाटील हे शेतकरी पुत्र आहेत. त्यामुळेच त्यांना शेतकऱ्यांच्या समस्यांची जाणीव आहे.या जाणिवेतूनच त्यांनी हे अभियान सुरू केले आहे. मराठवाडा आणि लातूर जिल्ह्यासाठी हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.हा प्रश्न सोडवून हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे यासाठी हे अभियान उपयुक्त ठरणार असल्याचे ते म्हणाले.

## सक्षम नेते - अफसर शेख

आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी जो जो प्रश्न हाती घेतला तो सोडवून घेतला आहे. पाण्याचा प्रश्न सोडवून घेण्यासही ते सक्षम आहेत.या नेतृत्वाला आपण पाठबळ दिले पाहिजे,असे ते म्हणाले.





औसा/प्रतिनिधी:कायम दुष्काळाशी सामना करणाऱ्या मराठवाडा आणि लातूर जिल्ह्यात पाण्याअभावी विकास होऊ शकलेला नाही.हा विकास साध्य करून विकासाचे नंदनवन फुलवायचे असेल तर हक्काचे पाणी मराठवाड्याला मिळालेच पाहिजे,असे मत आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केले.

जलसाक्षरता अभियानातील दुचाकी रॅली रविवारी (दि.२४) सकाळी लातूरहून निघाली.दिवस्भरात बुधोडा,हासेगाव,लामजना पाटी,किल्लारी,लामजना गांव,तपसे चिंचोली, नागरसोगा व औसा येथे दुचाकी रॅली पोहोचली. ठिकठिकाणी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ.निलंगेकर यांनी सांगितले की,भौगोलिक दृष्ट्या मराठवाड्याचे स्थान असे आहे जेथे कायमच कमी पाऊस पडतो.या भागात मोठ्या नद्या नाहीत त्यामुळे सिंचन तर सोडा पण पिण्यासाठीही पाणी मिळत नाही.त्यामुळे उद्योगधंदे या परिसरात येत नाहीत.शेतीला पाणी मिळत नसल्याने अपेक्षित उत्पन्न पदरात पडत नाही. त्यामुळे हा भाग विकासापासून कायमच वंचित राहिला आहे.आता शासनाने मराठवाड्याच्या हक्काचे पाणी देण्याचा निर्णय घेतला असून हे पाणी मांजरा व तेरणा खोऱ्यात सोडावे यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे आ.निलंगेकर यांनी सांगितले.

ठिकठिकाणी आ. निलंगेकर यांचे उस्फूर्त स्वागत करण्यात आले. गावोगावचे तरुण व नागरिक दुचाकी रॅलीत सहभागी झाले. स्थानिक लोकप्रतिनिधी,गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी व महिलांची लक्षणीय उपस्थिती दिसून आली.

स्वागत नाही आशीर्वाद...

आ.निलंगेकर म्हणाले की, मी ज्या-ज्या गावी जातो तिथे नागरिक उत्स्फूर्तपणे स्वागत करत आहेत. पुष्पहार घातले जात आहेत.अनेक ठिकाणी पुष्पवृष्टी करण्यात आली. या स्वागताने मी भारावून गेलो आहे.आपण करत असलेले हे स्वागत माझ्यासाठी आशीर्वाद आहेत.आपण उधळण केलेल्या फुलाच्या प्रत्येक पातळीतून उतराई होत हक्काचे पाणी आपल्या दारापर्यंत आणून देण्यासाठी मी वचनबद्ध आहे,असेही ते म्हणाले.

# जन शिक्षण संस्थान व जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने २७ सप्टेंबर रोजी लातुरात रोजगार मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

लातूर (प्रतिनिधी) :- जन शिक्षण संस्थान लातूर व जिल्हा उद्योग केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षित लाभार्थ्यासाठी रोजगार मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन २७ सप्टेंबर २०२३ रोजी करण्यात आले असल्याची माहिती एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे जन शिक्षण संस्थानचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, चेअरमन सुरेश मोदी व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक पी.डी. हनबर, लातूर व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष दिनेश गिल्डा, प्रभारी संचालिका सोनी दायमा यांनी केले आहे. जन शिक्षण संस्थान अंतर्गत प्रशिक्षण पुर्ण केलेल्या लाभार्थ्यांना शासकीय सुविधा, अर्थपुरवठा बाबत मार्गदर्शन करणे तसेच लाभार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी योग्य ते शासकीय पाठबळ मिळवून देणे, त्यांना स्वबळावर रोजगार निर्मितीची करण्यासाठी जाणीव जागृती निर्माण करेणे यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातुन रोजगार मेळावा घेण्याचे योजिले आहे. जन शिक्षण संस्थान लातूरच्या वतीने विविध व्यवसायिक प्रशिक्षण कोर्स चालविले जातात. कौशल्य विकास व उद्यमिता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांच्या माध्यमातुन जन शिक्षण संस्थान कार्यरत लातूर आहे. त्यात शिवणकला, ब्यूटी पार्लर, ड्रेस मेंकिंग व डिझायनिंग, फळ प्रक्रिया, हस्तकला, घरेलू काळजीवाहक, इलेक्ट्रानिक व हार्डवेअर, आदी विषयांचे प्रशिक्षण दिले जाते. आजतागायत जवळपास गेल्या १० वर्षामध्ये जवळपास १५००० महिलां व पुरुष यांना प्रशिक्षण दिलेले आहे. त्यातील अनेक महिला स्वतःच्या पायावर उभे असुन स्व-घरखर्चात मदत करतात. प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर लाभार्थ्यांना शासकीय सुविधा, व्यवसायाकरीता कर्ज सुविधा मिळण्यासाठीअनेक अडचणी येतात. शासनाच्या विविध योजना सर्व लाभार्थ्यांना मिळाव्यात यासाठी जिल्हा उद्योग केंद्र सातत्याने सहकार्य करत असते. लाभार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच त्यांच्या माध्यमातुन बचत गट निर्माण करुन त्यांना अर्थसहाय देण्याचा प्रयत्न जन शिक्षण संस्थानच्या माध्यमातुन केला जातो. लातूर जन शिक्षण संस्थान लातूर व जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातुन दिनांक २७ सप्टेंबर २०२३ रोजी कार्यालय, जन शिक्षण संस्थान, पडीले कॉम्प्लेक्स, एस.टी. वर्कशॉप च्या जवळ, शाम नगर, अंबाजोगाई रोड, येथे सकाळी ११ : ३० वा. रोजगार मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. मेळाव्या निमित्त लाभार्थ्यांना रोजगाराबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी रोजगार मार्गदर्शन मेळाव्यास आवर्जून उपस्थित राहुन याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रसिध्दी पत्रकात शेवटी जन शिक्षण संस्थानचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, चेअरमन सुरेश मोदी व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक पी.डी. हनबर, लातूर व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष दिनेश गिल्डा, प्रभारी संचालिका सोनी दायमा यांनी केले आहे.

# द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या लातूर जिल्हा उपाध्यक्षपदी श्री राठोड रमेश पंडीत यांची निवड.

लातूर :- द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या माध्यमातून राठोड रमेश पंडित यांची लातूर जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड झाली असून,हि निवड पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शेख अन्सार बाबासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली झाली . तसेच या पत्रकार संघांमध्ये काम करण्याची संधी मिळाली , छोट्याशा ग्रामीण भागातुन पत्रकारितेची सुरुवात करताना खंडाळी सर्कल प्रतिनिधी म्हणून काम करता करता तालुका प्रतिनिधी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली . आणि काही कालावधीतच उत्कृष्ठ अशा कामाची दखल



दैनिक जनतेचे मत या वृत्तपत्रात कार्यकारी संपादक म्हणून काम करत आहेत त्यांच्या वृत्तपत्राच्या माध्यमातून अनेक गोर गरिबांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे . या आत्तापर्यंतच्या सर्व कामाचा , केलेल्या वेगवेगळ्या उपकृमाचा , सामाजिक कार्याचा , यशाचा वाढता आलेख याची दखल घेऊन युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या लातुर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे तेंव्हा या निवडीचे औचित्य साधून सर्व समाज , सहकारी मित्रपरिवारकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्वांचा आर्शिवाद त्यांच्या कायम पाठीशी असल्याचे मत मित्रपरिवार आणि हिताचींकानी मांडले तसेच पत्रकार संघाच्या माध्यमातून लातूर जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या .

# पत्नीला स्वत:ची मालमत्ता विकण्याचा अधिकार

कोलकाता : पतीच्या परवानगीशिवाय पत्न-ीने आपली मालमत्ता विकली तर त्याला क्रूरता म्हणता येणार नाही, अशी टिप्पणी कोलकाता उच्च न्यायालयाने केली. उच्च न्यायालयात घटस्फोटाशी संबंधित एका खटल्याची सु-नावणी सुरू होती.कौटुंबिक न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध महिलेने अपील केले होते. न्यायमूर्ती हरीश टंडन आणि न्यायमूर्ती प्रोसे-नजीत बिस्वास यांच्या खंडपीठाने सांगितले की, दोघेही सुशिक्षित आहेत आणि जर पत्नीने पतीच्या परवानगीशिवाय तिच्या नावावर अस-लेली मालमत्ता विकली तर ती कोणत्याही प्रकारे क्रूरता नाही. कोलकाता उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले की असे दिसते की (पती आणि पत्नी) दोघेही सुशिक्षित आणि बुद्धिमान व्यक्ती आहेत. अशा परिस्थितीत पतीची संमती न घेता पत्नीने तिच्या नावावर असलेली संपत्ती विकण्याचा निर्णय घेतला, तर ती क्रूरता नाही. बार अँड बेंचने दिलेल्या अहवालानुसार, उच्च न्यायालयाने टिप्पणी केली आणि म्हटले की आपल्याला लैंगिक असमानतेची मानसिकता बदलावी लागेल. सध्याचा समाज स्त्रीयांवरील पुरुषांचे वर्चस्व मान्य करत नाही.दरम्यान पितृसत्ताक समाजातील कायदे लिंगावर आधारित आहेत आणि भारतातील महिलांसाठी मालमत्ता आणि वारसा कायदे परंपरेने शोषण करणारे आहेत. तो स्वातंत्र्योत्तर काळ होता आणि त्याहीपेक्षा अलीकडच्या काळात गोष्टी वर येऊ लागल्या. भारतात समान नागरी संहिता नसल्याने मालमत्ता आणि वारसा हक्क दावेदारांच्या विश्वासावर अवलंबून असतात. तथापि, स्त्रियांसाठी वारसा कायदा, मग त्या कोणत्याही धर्माच्या, समुदायाच्या किंवा पंथाच्या असोत, स्त्रियांना पुरुषांपेक्षा थोड्या वेगळ्या पद्धतीने प्रदान करतात.

स्त्रियांसाठी हिंदू वारसा कायद्यातील अलीकडील सुधारणांमुळे मुली आणि पत्नींना थोडा दिलासा मिळाला आहे. महिलांसाठीचे इस्लामिक कायदे मात्र वेगळे आणि अधिक कठोर आहेत आणि अलीकडच्या काळात वारसा किंवा मालमत्तेच्या अधिकारांशी संबंधित नसले तरी काही मर्यादित बदल घडवून आणले आहेत. ख्रिश्चन कायदे अधिक उदारमतवादी आहेत.

पती पत्नीच्या संमतीशिवाय निर्णय घेतो

उच्च न्यायालयाने पुढे म्हटले आहे की, जर पती पत्नीच्या संमतीशिवाय किंवा मताशिवाय कोणतीही मालमत्ता विकू शकतो, तर पत्नी देखील पतीच्या संमतीशिवाय तिच्या नावावर असलेली मालमत्ता विकू शकते.

ट्रायल कोर्टाच्या निर्णयावर प्रश्न?

कोलकाता हायकोर्टाने ट्रायल कोर्टाच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE